तरुण भारत
Nagpur Pages | 2023-04-09 | Page-1
epaper.tarunbharat.net

# स्वप्ने बघा, जगा, पूर्ततेसाठी प्रयत्न करा!

## अजय चौधरी यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

### आयआयएमचा सातवा पदवीदान समारंभ

◆ नागपूर, ८ एप्रिल

तुम्ही स्वप्ने बघा आणि ती जगा, तसेच त्यांच्या पूर्ततेसाठी सर्व परीने प्रयत्न करा. चहुबाजूंच्या आव्हानांना दूर सारा, आणि मनातील गोंधळ दूर करून ध्येयावर लक्ष केंद्रित करा, असा सल्ला एचसीएलचे संस्थापक अध्यक्ष अजय चौधरी यांनी दिला.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूरचा सातवा पदवीदान समारंभ शनिवारी सकाळी मिहान परिसरातील संस्थेच्या कॅम्पसमध्ये पार पडला. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, एचसीएलचे अजय चौधरी, ओयोचे सीईओ रितेश अग्रवाल आणि टेक महिंद्राचे प्रबंध संचालक व आयआयएम नागपूरचे प्रशासकीय मंडळ अध्यक्ष सी. पी. गुरनानी प्रामुख्याने उपस्थित होते.



उत्कृष्टतेचा पुरस्कार देताना डावीकडून भीमराया मेत्री, रितेश अग्रवाल, सी. पी. गुरनानी

यावेळी गुरनानी यांनी २०२१ च्या बॅचच्या २३४ विद्यार्थ्यांना एमबीए पदवी प्रदान केली.

मूळ स्वारस्याच्या पलीकडे विषयांबद्दल अधिक समजून घेणे. शिकणे कधीच थांबवू नका, असा सल्ला त्यांनी दिला. भारत आज खऱ्या अर्थाने अद्वितीय स्थितीत आहे. देशात अतिशय विस्मयकारी विकास होत आहे, नवी गुंतवणूक येत आहे या सर्व बाबींचा विचार करून त्यादृष्टीने काम करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. रितेश अग्रवाल यांनी, कोणत्याही क्षेत्रात जा पण आपले मूळ विसरु नका, तुम्ही आपल्या संपूर्ण संस्कृतीचा विचार करून आपले निर्णय आणि त्यापद्धतीने सर्व बाबींचा विचार करुन कामांची रचना करा, असे आवाहन केले. यावेळी संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी, संचालकांचा अहवाल सादर करताना विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच नव्याने झालेल्या सोयीसुविधांचा उल्लेख केला.

◀(तभा वृत्तसेवा)

### इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टर, निर्यातक्षम क्षेत्रावर भर

❝ इलेक्ट्रॉनिक्स मॅन्यूफॅक्चरिंगचे स्वतंत्र क्लस्टर आणि एक निर्यातक्षम क्षेत्र विकसित करण्यावर आपण भर देत आहोत. सध्या भारतातील सर्व ब्रॅण्ड निघून गेले आहेत आणि चीन स्वातंत्र्यपूर्व काळात ईस्ट इंडिया कंपनी काम करीत होती, त्या पद्धतीने काम करीत आहे, विद्यार्थ्यांनी ज्ञानसाधक होऊन प्रयत्न केले पाहिजेत.

- अजय चौधरी, संस्थापक अध्यक्ष, एचसीएल

### अनमोल, अर्पिता ठरले सर्वोत्कृष्ट

समारंभात अनमोल अग्रवाल यांना सर्वोत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीचा पुरस्कार देण्यात आला. सुवर्णपदक, तर अर्पिता कुमारी हिला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. समारंभापूर्वी आयोजित बैठकीत आयूष लोही आणि अनिता गिज्जी या विद्यार्थ्यांना बेस्ट ऑलराऊंड स्टुडंटचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

Powered by iDocuments